क्र.का-४/प्र.क्र.१९३८/२०१०/२००१
**नोंदणी महानिरीक्षक** व मुद्रांक नियंत्रक,
**महाराष्ट्र राज्य, पुणे** यांचे कार्यालय, पुणे-१
दिनांक :- ०२/११/२०१०

**विषय** :- आयकर अधिनियम १९६१ मधील तरतुदीनुसार दस्तऐवजामध्ये स्थायी खाते क्र. (PAN) अचूकरितीने नमूद केला असल्याची पडताळणी करणेबाबत व पॅन कार्डची प्रत दस्ताचा भाग करणेबाबत.

**संदर्भ** :- या कार्यालयाचे परिपत्रक ---

१. क्र.का.४/प्र.क्र.३०५२/६८९ ते ७४३, दि.२४/०५/२०००.
२. क्र.का.४/प्र.क्र.१९३८/२००३/१४३५-८०, दि.१८/०९/२००३.
३. क्र.का.४/प्र.क्र.१९३८/२००३/४२-९७, दि.२७/०१/२००४.
४. क्र.का.४/प्र.क्र.१९३८/२००३/५७८, दि.०४/०४/२००५.

**परिपत्रक** :-

सर्व नोंदणी अधिकाऱ्यांचे लक्ष संदर्भित परिपत्रकांकडे वेधण्यांत येत आहे. आयकर नियम १९६२ मधील पुढील महत्त्वपूर्ण तरतुदी पुनरपी निदर्शनास आणून देण्यांत येत आहेत --

१. नियम ११४ (बी) मधील तरतुदीनुसार रु. ५ लाख व त्यापेक्षा अधिक मुल्याचे खरेदी-विक्री / हस्तांतरणाच्या दस्तऐवजामध्ये लिहून घेणार व लिहून देणार यांचा आयकर कायद्याखाली दिलेला स्थायी खाते क्र. (PAN) नमूद करणे संबंधित पक्षकारांवर बंधनकारक आहे. तसेच एखाद्या व्यक्तीने असा स्थायी खाते क्र. (PAN) धारण केलेला नसल्यास, फॉर्म नं. ६० या नमुन्यामध्ये घोषणापत्र सादर करणे अनिवार्य आहे.

२. तसेच नियम ११४ (सी) मधील तरतुदीनुसार, जी व्यक्ती शेती व्यवसायातून उत्पन्न कमवित आहे आणि आयकर देय असणारे इतर कोणतेही उत्पन्न कमवित नाही, त्या व्यक्तीच्या बाबतीत उपरोक्त तरतुदी लागू होत नाहीत. मात्र त्या व्यक्तीने नमुना नं. ६१ या नमुन्यामध्ये घोषणापत्र सादर करणे अनिवार्य आहे.

३. उपरोक्त तरतुदीच्या अनुषंगाने, दुय्यम निबंधकांवर पुढील जबाबदाऱ्या सोपविण्यांत आलेल्या आहेत.

अ) सदर दस्तांमध्ये स्थायी खाते क्र.(PAN) योग्यरितीने नमूद केले आहेत याची खातरजमा दुय्यम निबंधक यांनी करावी असे सदर नियमांचे नियम ११४ (सी) (ii) मध्ये नमूद आहे.

ब) उपरोक्त तरतुदीनुसार प्राप्त झालेली नमुना नं. ६० व ६१ मधील घोषणापत्रे, दुय्यम निबंधकांनी नियम ११४ (डी) नुसार संबंधित क्षेत्राचे कमिशनर ऑफ इन्कम टॅक्स (सेंट्रल इन्फर्मेशन ब्रँच) यांचेकडे सादर करावयाची आहेत.उक्त नियमातील तरतुदीनुसार दि. १ एप्रिल ते ३० सप्टेंबर या कालावधीत प्राप्त घोषणापत्रे दि.३१ ऑक्टोबर पर्यंत व दि.१ ऑक्टोबर ते ३१ मार्च या कालावधीत प्राप्त घोषणापत्रे दि. ३० एप्रिल पर्यंत सादर करणे आवश्यक आहे.

तरी राज्यातील सर्व दुय्यम निबंधकांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यांत येते की.

**अ)** आयकर विभागाने केलेल्या तपासणीमध्ये काही दस्तामध्ये नमूद केलेले स्थायी खाते क्र. (PAN) व मूळ स्थायी खाते क्र.(PAN) यामध्ये तफावत असल्याचे आढळून आले आहे. वरील तरतुदी लागू असतील, त्या दस्तामधील पक्षकारांचे स्थायी खाते क्र. (PAN) दस्तामध्ये योग्यरितीने नमूद करण्यांत आले आहेत याची खातरजमा करावी, या प्रयोजनार्थ संबंधितांकडे मूळ पॅन कार्डची मागणी करावी व खातरजमा करुन, पॅन कार्डची सुवाच्य प्रत दस्ताचा भाग म्हणून जोडून घ्यावी.

ज्या पक्षकारांकडे स्थायी खाते क्रमांक आहे तथापि, पॅन कार्ड प्राप्त नाही / गहाळ झालेले आहे त्यांचेबाबतीत त्यांनी आयकर विभागाच्या **www.incometaxindia.gov.in** या वेबसाइटवरुन प्राप्त करुन घेतलेला पॅन नंबर नमूद असलेला रिपोर्ट त्यांचेकडून साक्षांकित (self attested) करुन, दस्तास जोडून घेण्यास हरकत नसावी.

नोंदणी प्रणालीमध्ये डाटा एन्ट्री करतेवेळी तसेच आयकर विभागास ए.आय.आर.अगर तत्सम माहिती पाठविताना त्यामध्ये सदर स्थायी खाते क्र.(PAN) अचूकरित्या नमूद करावा.

**ब)** ज्या पक्षकाराने स्थायी खाते क्र. (PAN) धारण केलेला नाही, त्यांचेकडून फॉर्म नं. ६० व शेती उत्पन्नाचे बाबतीत फॉर्म नं ६१ नमुन्यामध्ये घोषणापत्रे घेण्याचे नियमांचे काटेकोरपणे पालन करावे व सदर घोषणापत्रे डायरेक्टर ऑफ इन्कम टॅक्स, (सेंट्रल इन्फर्मेशन ब्रँच) यांचेकडे पुढील पत्त्यावर उपरोक्त नमूद मुदतीत सादर करण्याची दक्षता घ्यावी.

मुंबई विभागासाठी -- डायरेक्टर ऑफ इन्कम टॅक्स, (सेंट्रल इन्फर्मेशन ब्रँच).
महालक्ष्मी चेंबर्स, मुंबई- ४०० ०३४.
उर्वरित महाराष्ट्रासाठी --- डायरेक्टर ऑफ इन्कम टॅक्स, (सेंट्रल इन्फर्मेशन ब्रँच),
६०/६१,प्राप्तीकर सदन, कर्वे रोड, एरंडवणा,पुणे-४११ ००४

(सही /-)
( एस. चोक्कलिंगम् )
**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे.**

प्रति,

सर्व दुय्यम निबंधक (सह जिल्हा निबंधक यांचेमार्फत).

प्रत :-

१. सर्व नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक यांना माहितीकरिता.
२. सर्व सह जिल्हा निबंधक/दुय्यम निबंधक व प्रशासकीय अधिकारी, मुंबई शहर /मुंबई उपनगर. यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीकरिता.
३. सर्व कार्यासन अधिकारी, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे यांना माहितीकरिता.
४. मा. डायरेक्टर ऑफ इन्कम टॅक्स, (सीआयबी), मुंबई / पुणे यांना माहितीकरिता.

निर्गमित
२१/११/१०
**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे करिता.**